# मेट्रो ३ प्रकल्पातील दुसरा ब्रेकथ्रू सीप्झमध्ये

किरण कारंडे ▸▸ मुंबई
kkiran@mymahanagar.com

कुलाबा - वांद्रे - सीप्झ या मेट्रो ३ प्रकल्पातील महत्वाचा आणि २०१८ या वर्षातील दुसरा ब्रेकथ्रू हा सीप्झ स्टेशन नजीक होणार आहे. येत्या २६ डिसेंबरला हा ब्रेकथ्रू होईल, असे अपेक्षित आहे. मेट्रोच्या मुंबईभर सुरू असलेल्या कामात सीप्झ परिसरातील आव्हानात्मक टप्पा विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आला आहे. संपूर्ण मेट्रो ३ प्रकल्पात १७ टनेल बोरिंग मशीनचा वापर करत आतापर्यंत १४ किलोमीटरचा पल्ला पार करण्यात आला आहे. ब्रेकथ्रू होणार असलेल्या सीप्झची जागा ही झोपडी आणि अनेक झाडांचा परिसर असलेला टप्पा होता. एकूण ५६८ मीटरचे टनेलिंगचे काम सारिपुतनगर येथे सुरू झाले, तर सीप्झ मेट्रो स्टेशन येथे हे ब्रेकथ्रूचे काम पूर्ण होणार आहे.

सध्या सारीपुत नगर ते सीप्झ दरम्यानचे एकूण अंतर ५६८ मीटर आहे. वैणगंगा २ टीबीएमच्या माध्यमातून भूगर्भात टीबीएम दिवसापोटी १० मीटर अंतर दररोज कापण्यात येत आहे. २३ ऑगस्टला या कामाची सुरुवात झाली आहे. आतापर्यंत ५५२ मीटर टनेल बोरिंग करण्याचे काम पूर्ण झाले आहे. तर उर्वरित काम हे २६ डिसेंबरला पूर्ण करण्याचे उद्दिष्ट मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने ठेवले आहे. आणखी १६ मीटरचे काम उर्वरित असून हा पल्ला ब्रेकथ्रूच्या निमित्ताने लवकरच पूर्ण करण्यात येईल. टीबीएम मशीन प्रत्येक मिनिटाला तीन राऊंडच्या माध्यमातून काळा बसाल्ट हा दगड पोखरते. तर टीबीएमचे वजन ७०० टन असून टीबीएमची लांबी ९२ मीटर इतकी आहे. ब्रेकथ्रू नंतर याठिकाणचे टनेल बोरिंग मशीन काढून हे टीबीएम नयानगर येथे वापरासाठी उपलब्ध होईल.

## नव्या वर्षात शिवसेना भवनासमोर ब्रेकथ्रू



### पुढचा ब्रेकथ्रू सेनाभवन

मेट्रो ३ प्रकल्पाअंतर्गत फेब्रुवारी महिन्यात मोठ्या प्रमाणावर ब्रेकथ्रू अपेक्षित आहेत. दादर, चर्चगेट आणि वरळी परिसरातील टनेल बोरिंगची कामे पूर्ण होणार असल्याने याठिकाणी ब्रेकथ्रूचे काम पूर्ण होणे अपेक्षित असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी दिली. दादर शिवसेना भवन परिसरातील ब्रेकथ्रू हा फेब्रुवारीमध्ये होणे अपेक्षित आहे, असेही त्यांनी सांगितले. एकाचवेळी अनेक ठिकाणी ब्रेकथ्रू आगामी वर्षातील फेब्रुवारी महिन्यांमध्ये होतील, असे त्यांनी स्पष्ट केले.